# जिल्हा परिषद अमरावती

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय

कॅम्प रोड, अमरावती ४४४ ६०१

दूरध्वनी क्रमांक - २६६२९२६ ई मेल - ceozp.amravati@maharashtra.gov.in

वेबसाईट - www.zpamravati.gov.in

क्रमांक जिप/मुकाअ/ 57 /स्वीस/2017

दिनांक - 9 मे, 2017

प्रति,

श्री. प्रमोद डोंगरे,

कार्यकारी अभियंता, बांधकाम

जिल्हा परिषद अमरावती

**विषय - प्रलंबित कामाबाबत....**

आपणाशी झालेल्या प्रत्यक्ष चर्चेनुसार मुख्यालयीन कार्यालयीन इमारती, देखभाल आणि दुरस्ती संदर्भात आपणास व आपले अधिनस्त अधिकारी यांना खालील प्रमाणे कामे करण्याबाबत सूचित करण्यात आलेले आहे. परंतु अद्यापपर्यत आपले विभागाकडून या सदंर्भात कार्यवाही झालेली निदर्शनास येत नाही.

1. कर्मचारी-अधिकारी यांची वाहने ठेवण्यासाठी आरोग्य विभागाचे बाजुकडील मुख्य दरवाजा बंद केल्यानंतर लगतच्या जागेवर (कँटींगचे बाजूला) वाहनतळ नियोजीत करण्यात आलेले होते. आजपावेता त्याठिकाणी वाहने ठेवण्यासाठी पुरेशी व्यवस्था करण्यात आलेली नाही. तसेच पार्कींगचे फलक सुध्दा लावण्यात आलेले नाही.
2. मुख्यालयात महिला प्रसाधनगृह अपुरे असल्याने महिला पदाधिकारी-अधिकारी-कर्मचारी यांची गैरसोय होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. मा. प्रधान सचिव श्रीमती मालिनी शंकर यांचे अमरावती जि.प. भेटी दरम्यान सदरची बाब आपले विभागास सूचित करण्यात आलेली होती. अद्यापपर्यत त्यादृष्टीने आपले विभागाकडून प्रयत्न करण्यात आलेले नाहीत.

3. शिक्षण विभाग ते पंचायत समिती भातकुली कार्यालयासमोरील रस्ता अतिशय खराब झाला असल्याने सदर रस्ता दुरुस्तीबाबत/नव्याने करण्याबाबत माझे दिनांक 16 डिसेबर 2016 चे अ.शा. पत्राव्दारे आपणास व्यक्तिशः कळविण्यात आलेले आहे. तसेच खाते प्रमुखांच्या बैठकीत सुध्दा आपणास तशी सूचना करण्यात आलेली होती परंतु अद्यापर्यंत त्यादृष्टीने आपले विभागाकडून प्रयत्न झालेले नाहीत.

4. राष्ट्रीय पाटबंधारे संघटना विरुध्द जिल्हा परिषद अमरावती प्रकरणात पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती येथे दाखल करण्यात आलेल्या तक्रारीचे अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीची अद्यावत माहिती सादर करण्याची जबाबदारी श्री. ठाकुर शाखा अभियंता यांचेवर सोपविण्यात आलेली होती. श्री. ठाकुर यांनी याबाबतची लेखी अथवा तोंडी माहिती माझे कार्यालयास सादर केलेली नाही.

5. जि.प.कडील कंत्राटदार नोंदणीसाठी सॉफट्वेअर तयार करण्याचे काम स्वतंत्र एंजेन्सीमार्फत करण्यात येत आहे. सॉफटवेअर एंजेन्सीला आवश्यक माहिती श्री. लाहोरे, शा.अ. यांना कळविण्यात आलेली आहे. माहिती अभावी सॉफटवेअरचे काम पुर्ण होण्यास अडचण येत आहे.

6. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयातील अॅन्टीचेंबरमधील दुरुस्ती तसेच निवासस्थानावर वाहनचालक, पहारेकरी इ. कर्मचा-यांसाठी शौचालय बांधकाम करण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते. परंतु अद्यापपर्यंत कामास सुरुवात करण्यात आलेली नाही.

7. बेलोरा ता. चांदूर बाजार येथील मंजुर कामाचे भूमीपूजन/उद्घाटनाबाबतचा चौकशी अहवाल अभिप्रायासह सादर करण्याबाबत आपणास कळविण्यात आले होते. एक आठवडयाचे वर कालावधी होवून सुध्दा सदर प्रकरणी आपले विभागाकडून अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

8. जि.प. शाळा भंडारज ता. अंजनगांव सुर्जी येथील शाळा खोल्या निर्लेखन करुन त्या ठिकाणी नव्याने बांधकाम करावयाचे आहे. त्यासाठी उप अभियंता, उप विभाग दर्यापूर यांचेकडून निर्लेखनासाठीची कार्यवाही केली असल्याचे समजते, परंतु योग्य तो प्रतिसाद न मिळाल्यामुळे -हरासाची कार्यवाही होवू शकत नसल्याचे ग.वि.अ. यांचेकडून कळविण्यात आले आहे. सदर प्रकरणी उप अभियंता यांना उचित कार्यवाही करुन त्वरीत -हरास प्रक्रिया पूर्ण होईल या पध्दतीने कार्यवाही करावी. सदर प्रकरणात संबंधित विधानसभा क्षेत्रातील सन्मा. विधानसभा सदस्य पाठपुरावा करीत असल्याने तातडीने कार्यवाही अपेक्षीत आहे.

**9.** मे. संजय कनस्ट्रक्शन, अमरावती यांनी दाखल केलेल्या प्रकरणात तातडीने नियमानुसार उचित कार्यवाही करुन संबंधितास कळविण्यात यावे.

वरील मुद्यांबाबतचे अनुपालन दिनांक 15 मे, 2017 पूर्वी करुन मला लेखी अवगत करावे.

**(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

**प्रत -**
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अमरावती.